गुलाब-वाटिका - १७

हिंदुराष्ट्राचा परकीयांनी केलेला गौरव
स्वोत्कर्षबोधक इतिहास

भारत वैभव गाथा

श्रीगुलाबराव महाराज जीवनशताब्दी प्रकाशन
२०-९-२०१५

कृष्ण माधव

** संपर्क : नारायण मोहोड ०९८२२४४०९५१*
श्रीगुलाबरावमहाराज-ट्रस्ट, आळंदी-देवाची, जि.पुणे.

रु.१०

A

अणुक्रमणिका

परकीयांनी केलेला गौरव
१. प्राचीन इतिहासलेखन (७)
२. कालचक्राने उलथापालथ (१०)
..दिवसाचा आरंभ केव्हापासून?(११)
३. पृथ्वीचा नमुना-हिंदुस्थान (१२)
४. पहिला मानव हिंदुस्थानात(१४)
५. मानव संस्कृतीचा उगम(१५)
६. सर्व ज्ञानशाखा व सर्व धर्मांचे उगम स्थान (१५)
७. ऋग्वेदाचा काळ अगम्य (१६)
८. अखंड ऋण (१६)
९.मानवी अभिमानाची गोष्ट(१७)
१०.स्त्रियांची ज्ञान साधना (१७)
११. सर्वात जुने व अजूनहि टिकलेले हिंदुराष्ट्र (१८)
१२.हिंदुस्थानची शिकवण (१८)
१३.प्रचंड ग्रंथसंपत्ती : काव्यमय (२०)
१४. ८००० वर्षापूर्वी बाक्ट्रियात हिंदु राजा (२२)
प्राचीन राज्यपद्धती
१५.कलहात्मकपद्धती कारणे(२३)
१६. प्राचीन हिंदुस्थान(२४)
१७. भारत व युरोप (२५)
१८. लोकसत्ताक-संघ = प्राचीन भारत (२६)
१९. व्यक्तिस्वातंत्र्य (२७)
२०. लोकसत्ताकाची बीजे (२७)
२१.स्वयंपूर्ण लोकसत्ताकनगरे(२७)
मनुस्मृति
२२.ग्रामराज्ये (२९)
२३.युरोपः मनुस्मृतीप्रभाव(३०) बायबल इन इन्डिया(३०)
२४. खूप सुधारलेल्या लोकांचे नियम (३१)
२५. मनु. राजांनाही शिक्षा(३२)
२६. मनुस्मृतीबद्दल आदर (३३)
सांख्य दर्शन
२७. परिश्रम आणि गूढज्ञान (३३)
२८.सांख्यानुवाद=उत्क्रांतिवाद(३४)
उपनिषदीय तत्त्वज्ञान
२९. बर्कलेतत्त्वज्ञान खुरटे(३४)
३०. शांकरभाष्याची महती(३५

B

३१. उपनिषदांचा अभ्यास हेच परमोच्च सुख (३६)
३२.कुठे ग्रीक कुठे आर्य(३७)
औषधी शास्त्र
३३. आरोग्य-रक्षक मनु (३७)
३४.आर्य वैद्यकाचा विस्तार(३८)
३५. भरभराटीचे कारण (३९)
शस्त्रक्रिया
३६. आयुर्वेद : शस्त्रक्रिया(३९)
३७. नासिक प्रत्यारोपण (४०)
३८. प्लॅस्टिक सर्जरीचे (४१)
३९. शरीरशास्त्राचीसूक्ष्मता(४१)
४०.आयुर्वेद-अरबी भाषेत (४२)
४१.आयुर्वेदाचे पुनरागमन(४२)
४२. मागमूसही नाही (४३)
४३.शिष्य गुरूस शिकवितो (४४)
४४. अवनतीचा फेरा (४४)
गणित
४५.हिंदूंचे गणित शास्त्र (४५)
४६.शून्यःजगाला देणगी (४६)
४७. लिपी व दशांश पद्धती (४६)
विज्ञान
४८. भारताचे जगावर ऋण (४७)
भूमिती
४९ज्योतिष-कोष्टके (४८)
५०त्रिकोण आणि वर्तुळ (४८)
बीजगणित
५१भास्कराचार्य बीजगणित(४९)
५२भारतीय रीतीःसोप्या(५१)
५३वैदिक गणित सूत्रे शंक.भारतीकृष्णतीर्थ (५१)
व्याकरण
५४भाषाशास्त्र (५२)
५५युरोप१५००वर्षे मागे(५२)
पाणिनी
५६भव्य प्रासाद मंदिर (५३)
५७प्रयत्न-कल्पकता (५४)
५८आर्यांचा हात धरण्याचे साहस नाही (५५)
५९कोशग्रंथ (५५)
रामायण
६०रामायण-ग्रीक महाकाव्ये(५५)
महाभारत
६१महाभारताची थोरवी (५८)
६२विश्वाचे कल्याण इच्छिणारे महाभारत (५९)
६३व्यास आणि होमर (६१)

C

६४. प्लेटोपेक्षा व्यासांचा मोठेपणा (६१)
६५. सर्व ज्ञानशाखांत संपन्नता (६३)
६६. आयुष्य पुरणार नाही (६३)
६७. हिंदू हारले जाणारे नाहीत (६४)
६८. बुद्धीचा शेवटचा पल्ला (६४)
६९. सूर्य आणि काजवा (६५)
जगद्गुरु भारत
७०. भारत सर्व जगाच्या गुरुस्थानी (६५)
७१. निरक्षर पण उच्च संस्कारसंपन्न (६६)

(१)

.....स्व-उत्कर्ष-बोधक इतिहास.....

(२)

श्रीगुलाबरावमहाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचे शिल्पकार

श्रीबाबाजीमहाराज पंडित

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले. १९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल घरदार शिक्षण वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला. महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे वगैरे लहानमोठी सर्व प्रकारची कामे जीव ओतून केलीत. जणुं ज्ञानेश्वरीतील सद्गुरुसेवा मूर्तिमंत साकार झाली.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत ते प्रमुख होते. त्यांनी महाराजांची अगदि निरपेक्ष सेवा केली पण त्यांनी महाराजांना केव्हाच काहीहि मागितलं नाही. त्यांचे ते निर्व्याज आणि उत्कट प्रेम पाहून महाराजांनी उद्गार काढले - ''मी पंडिताला वश झालो आहे''

गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं? शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन आशीर्वाद दिला-

''अरे पंडित, आजवर मी तुला काही दिलं नाही.
माझे ग्रंथ वाच. तुला समजतील! ''

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं.' पंडितांचं सारं जीवनच उजळून गेलं. त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित झालीत अनूपंडितांच्या अखंड परिश्रमांनी महाराजांची वाङ्मयीन मूर्ती साकारली. द्रष्ट लागावं असं अक्षरशिल्प मुद्रांकित होऊन सर्वांना उपलब्ध झाल!

.....स्व-उत्कर्ष-बोधक इतिहास.....

(३)

श्रीगुलाबरावमहाराज : जीवनकार्य

(इ.स.१८८१ ते १९१५)

''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. चवथ्या महिन्यात नेत्रहीन, माधान-खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे.

श्रीमहाराजांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

.....स्व-उत्कर्ष-बोधक इतिहास.....

(४)

भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे. तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून शंकराचार्यांच्या अद्वैतात 'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.

जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त जगापुढे मांडला. आणि आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्यासाठी समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले. ०००

युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे.

संपर्क : श्रीरंग घटाटे. बोलेपेट्रोलपंप, अमरावतीरोड, सिव्हिल लाइन नागपूर ४०००१.
टे-९३७२५२९७७० / ०७१२-२५३३९९७

.....स्व-उत्कर्ष-बोधक इतिहास.....

२.स्व-उत्कर्ष-बोधक इतिहास

आपल्या प्राचीन हिंदुराष्ट्राचा

युरोपियनांनी केलेला गौरव

इंग्रज आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांनी विजिगिषु वृत्तीने केलेल्या विकृत प्रचारामुळे, आपण भारतीय लोक आपल्या प्राचीन पूर्वजांच्या इतिहास- तत्त्वज्ञान- साहित्य- संगीत- काव्य- कला आणि इतर सर्व शास्त्रांकडे तिरस्कार बुद्धीने पाहू लागलो. त्यामुळे यच्चयावत् मानव वंशाला भूषणभूत असलेल्या ज्ञानशाखांच्या शास्त्रीय परंपरा देखील नष्टप्राय झाल्या आणि आपला भारतीय समाज भौतिक विकासाने मिळणाऱ्या सुखलोलुपतेच्या मागे लागला.

ही विकृती दूर करण्यासाठी, इंग्रजांचेच भाईबंद असलेल्या- पण मोकळ्या मनाने आर्यसंस्कृतीचा सखोल अभ्यास करणाऱ्या- युरोपियन पंडितांनी प्राचीन आर्यसंस्कृतीविषयी जे गौरवाचे उद्गार काढले आहेत ते

समजून घेणे अगत्याचे आहे. आपल्यो पूर्वजांविषयी झालेले आपले गैरसमज दूर करण्याचे श्रेय या गौरवपूर्ण उद्गारांना नक्कीच आहे.

श्रीगुलाबरावमहाराजांनी प्रतिपादन केलेल्या इतिहासविषयक दृष्टिकोणाला पोषक असे पुरावे येथे उद्धृत करणे उचित राहील. असा हा **भारतीयांचा स्वोत्कर्ष बोधक इतिहास** युरोपियनांच्याच शब्दातून अति थोडक्यात पाहण्याचा प्रयत्न करू.

''सर विल्यम जोन्स, प्रो. विल्सन, कोलब्रुक, मॅक्समूलर, कर्नल टॉड, पोकॉक, वगैरे युरोपियन पंडित व इतिहासकार यांनी प्राचीन हिंदुराष्ट्राबद्दल लिहिलेले गौरवोद्गार म्हणजे वेदवाक्य आहे, या समजुतीने या पाश्चात्य पंडितांची मते या ठिकाणी उद्धृत केलेली नाहीत. अगदी तिऱ्हाईत व प्रतिष्ठित साक्षीदारांच्या साक्षीस न्यायालयात विशेष महत्व असते. त्याच दृष्टीने या आधारांचे महत्व आहे. वास्तविक युरोपियन पंडितांनी हिंदुस्थानाविषयी अनादर दाखविणे व निंदा करणे हे स्वाभाविकच आहे, पण असे असूनही त्यांनी हिंदुस्थानचा

आदर, गौरव व स्तुती केली असेल ती पूर्ण विचारांती पूर्ण खात्री झाल्यामुळेच व कदाचित् नाईलाज झाल्यामुळे केली असेल; असे गृहीत धरण्यास, हरकत नाही.

निव्वळ भाटाच्या स्तुतीपेक्षा आरंभी निंदक असून पुढे गुणग्राहक व नंतर स्तुतिपाठक बनलेल्यांनी केलेल्या स्तुतीची योग्यता अर्थातच अधिक आहे.'' *(द.गो. लिमये. **'भारतीय श्रेष्ठत्व'** या पुस्तकाची प्रस्तावना, चित्रशाळा प्रेस, पुणे.)*

१. प्राचीन भारतातील इतिहासलेखन

कर्नल टॉडसाहेब राजपुतान्याच्या इतिहासाचे प्रस्तावनेत लिहितातः-

''महंमदाच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊ लागल्यापासून तेथे झालेल्या विद्ध्वंस, अत्याचार, संहार यांचा विचार करता हिंदुस्थानात इतिहास ग्रंथ शिल्लक राहिले नाहीत, याचे आश्चर्य वाटावयास नको व ''हिंदूंना इतिहास लिहिणे माहीतच नव्हते असे अशक्य अनुमानही काढावयास नको.''

इतर सुधारलेल्या देशात अतिप्राचीन

काळापासूनच इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति दिसून येत असून, अति सुधारलेल्या प्राचीन हिंदुराष्ट्रात मात्र ती नव्हती हे म्हणणे मुळीच शोभत नाही.

सूक्ष्म व व्यापक दृष्टीवर अवलंबून असणारी ज्योतिष-गणितादि शास्त्रे ज्यांनी पूर्णत्वास नेली, शिल्प, मूर्ति, काव्य, गायन ह्या कला ज्यांनी निर्माण केल्या; येवढेच नव्हे, तर त्या संबंधाचे अति सूक्ष्म व व्यापक नियमही ज्यांनी घालून देऊन त्यांची शास्त्रे बनविली, त्यांस राजांचे स्वभाव, त्यांची चरित्रे व त्यांचे कारकीर्दीत घडलेल्या गोष्टी लिहून ठेवण्याची साधी व सोपी कला मुळीच माहीत नव्हती; अशी कल्पना तरी करता येईल काय?''

(Can it be ~~It is~~ to imagined that a nation so highly civilsed as Hindus amongst whom the exact sciences flourished in perfection, by whom the fine arts, architecture, sculpture, poetry, music were not only cultivated, but taught and defined by the nicest and most elaborate rules, were totally unaccounted with the simple art of recording

the events of their history, the characters of their princes and the acts of their reigns?)

जुने इतिहासग्रंथ - कल्हणाची राजतरंगिणी (काश्मिरातील), विजयविलास, सूर्यप्रकाश, खिमात, जगद्विलास, राजप्रकाश, जयविलास, खोमानरासा, मानचरित्र इत्यादि राजस्थानातील ग्रंथ, गुजराथचा इतिहास सांगणारी रासमाला, पृथ्वीराजरासा वगैरे अनेक ग्रंथ होते. अबुल फाजलने हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाची जी माहिती दिली, ती त्याने कशावरून तरी घेतलीच ना !

चंदाच्या 'पृथ्वीराजरासा' ग्रंथातील उल्लेखावरून असे अनुमान होते की त्याचे वेळी दुसरेहि बरेच ग्रंथ प्रचलित होते. चंद वगैरे भाट अडाणी होते असे कोणी मानू नये. राज्यकारभार, परराष्ट्रसंबंध, राजनीती वगैरे संबंधाचेहि जे अध्याय चंदाचे ग्रंथात आहेत. त्यावरून भाट अडाणी होते असे मुळीच दिसत नाही.''

(हिंदू सुपिरिऑरिटी- पं. हरविलास सारदा पा.९६)

२. कालचक्राने उलथापालथ

सांप्रतकाळी ज्या देशात केवळ रानटी लोकांचीच वस्ती आहे असे देश जगाचे आरंभापासून त्याच स्थितीत आहेत असे गृहीत धरून राष्ट्राच्या किंवा देशाच्या संस्कृतीची प्राचीनता ठरविण्याचे काहीच कारण नाही.

एखादा देश अत्यंत सुधारलेला असूनही तेथील संस्कृति प्रचंड भूकंप, ज्वालामुखीचे उद्रेक, जलप्रलय किंवा क्रांती यांनी नामशेष होऊन तेथे पुनः रानटी स्थिति येण्याचाही संभव आहे, ही गोष्ट विसरता कामा नये. तसेच जगात अति प्राचीन काळी एक देश अगदी रानटी स्थितीत असला म्हणजे त्या काळी सबंध पृथ्वीवरील सर्वच देशांची तशीच स्थिती होती असेही गृहीत धरण्याचे कारण नाही. (भारतीय श्रेष्ठत्व २१)

या दृष्टीने पाहिले असता युरोप, इजिप्त, दक्षिण व उत्तर (मध्य) अमेरीका, आणि हिंदुस्थान यांच्या प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासात जमीन

अस्मानचा फरक कां आहे, याची संगती लागते.

..दिवसाचा आरंभ केव्हा मानायचा?

पी.एन.ओक -

भारत आणि इंग्लंड यांच्या सूर्योदयाच्या वेळेत साडेपांच तासांचा फरक आहे. भारतात सकाळी ६ वाजता सूर्योदय झाला की इंग्लंमध्ये रात्रीचे १२ वाजलेले असतात. किंवा ग्रिनविचला सूर्योदय असताना भारतात रात्रीचे १२ वाजलेले असतात.

दिवसाचा आरंभ सूर्योदयाला होतो हे कोणाला सांगावयास नको. भारतीय पंचांगातही तिथीचा निश्चय सूर्योदयानुसारच असतो पण आजचे सारे जग रात्री १२ ला दिवसाचा आरंभ मानते हे आश्चर्य नव्हे काय? पण याचे कारण वेगळेच आहे. प्राचीन भारत विश्वाचा केंद्रबिंदू होता. त्या काळी भारताच्या प्रभावामुळे सारे जग भारतातील सूर्योदय म्हणजे दिवसाचा आरंभ मानीत असे. त्यामुळे इंग्लंडचा दिवस रात्री १२ ला सुरू होई. पण मधल्या अंधःकार युगात साऱ्या परंपरा, सारी संस्कृती, सारी शास्त्रे सर्वच विस्मरणात गेले. आणि

मागील ३-४ शे वर्षात इंग्लंडने आपले वैभव वाढविले, साम्राज्याचा अफाट विस्तार केला, आपली भाषा पूर्ण जगाला दिली आणि कालमापनाची रीतही शिकविली. अन् त्यामुळेच इंग्लंडप्रमाणे सर्व जगात रात्री १२ ला दिवस सुरू झाला. पण त्यामुळे बुद्धीला न पटणारी, निसर्गाच्या विरुद्ध असलेली, अतार्किक आणि मूर्खपणाची – **''दिवसाचा आरंभ रात्री मानण्याची,''** अशास्त्रीय संकल्पना साऱ्या जगाने डोळे झांकून स्वीकारली. (विख्यात इतिहासकार **पी.एन.ओक**)

परंतु या सर्वांच्या मूळाशी प्राचीन भारताची विश्वगुरुत्वाची वैभवशाली परंपराच एका वेगळ्या अर्थाने कायम आहे, हे मात्र खरे !

३. सर्व पृथ्वीचा नमुना - हिंदुस्थान

कौंट जॉर्नस्टजर्ना -

''या हिंदुस्थान देशातील सृष्टिदेवतेने चित्रविचित्र व अनेक रंगाचे बहुमोल वस्त्रच पांघरले आहेसे वाटते. या देशात उन्हाळ्यात एकदम वर येणारी मुबलक वनस्पतीरूप संपत्ति व पावसाळ्यात होणारी भयंकर वादळे,

हिमाच्छादित हिमालयाची भव्यता व वालुकामैदानाचा रखरखितपणा, उत्तर हिंदुस्थानातील अति विस्तीर्ण मैदाने व गगनचुंबित पर्वतावरील सृष्टिशोभा, ही सर्व पाहणाराचे मनावर तेथील सृष्टीची विलक्षणता, भव्यता व चमत्कृति यांचा कायमचा परिणाम झाल्यावाचून राहत नाही.''
(Theogony of Hindus, P.126)

''हिंदुस्थान हा सगळ्या पृथ्वीचाच एक लहानसा नमुना आहे''

India is an epitome of the whole world.
(Chamber's Encyclopedia P. 337)

असे जे एका मार्मिक लेखकाने म्हटले आहे ते अक्षरशः खरे आहे.''

कौंट जॉर्नस्टजर्ना -

''नखशिखांत लोखंडी चिलखत घातलेला राजपुतान्यातील अश्वारुढ योद्धा व काशीच्या देवालयातील ईश्वरधर्मनिष्ठ ब्राह्मण पहा; आपल्या लढाऊ जहाजातून किंवा चपळ घोड्यावरून त्वरेने हालचाली करणारा कडवा मराठा व हत्तीवर बसून मंदगतीने चालणारा नबाब याजकडे दृष्टी फेका; अगर जंगलात वाघाची शिकार करणारी वीर स्त्री

व आपली कामवासना देवालाच अर्पण करणारी मुरळी, याजकडे नजर फेका; तुम्हास हिंदुस्थानात विलक्षणता, भव्यपणा व चमत्कार हे आढळल्यावाचून राहणार नाहीत''
(Theogony of the Hindus, P. 126)

म्यूर -

''हिंदुस्थानातील सृष्टिशोभेची भव्यता, विशालत्व व विविधता आणि तेथील भूमीत उत्पन्न होणारी अनेक प्रकारची बहुमोल व मुबलक धान्यसंपत्ती या बाबतीत जगातील कोणताहि देश हिंदुस्थानची बरोबरी करू शकणार नाही''*(हिंदुस्थानचा इतिहास पृ.१)*

४. पहिला मानव हिंदुस्थानात जन्मला

सर वाल्टर राले -

यांनी आपल्या जगाच्या इतिहासात पृ. ९९ वर ''भरतखंडात प्रथमच मनुष्यप्राणी जन्मास आला व तेथूनच तो सर्व पृथ्वीवर पसरला.'' असे म्हटले आहे. (भा. श्रे. ९८)

५. मानव संस्कृतीचे उगम स्थान

कर्नल अल्कॉट -

''हिंदुस्थान हेच मानवजातीचे व मानव संस्कृतीचे मूळस्थान होय.'' असे **काउंट जर्नस्टजनी**
(Theogony of Hindu P. 168)

व कर्नल अल्कॉट(थियासफी मार्च १८८१) यांनीहि म्हटले आहे.

६. सर्व ज्ञानशाखा व सर्व धर्मांचे उगम स्थान

मिसेस मॅनिंग -

'हिंदुराष्ट्राच्या मनाची व बुद्धीची भरारी जितकी उंच व दूर पोचलेली आहे,तितकी पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही राष्ट्राची पोचलेली नाही'
(Ancient & Mediaeval India vol II P. 148)

प्रो. हीरेन-

''केवळ आशिया खंडातीलच नव्हे तर युरोपखंडातील लोकांच्याही सर्व ज्ञानाचा व धर्मांचा उगम हिंदुस्थानातच

आहे.'' (भा. श्रे. ५)
(Historical Researches, Vol. II P. 45.)

७. ऋग्वेदाचा काळ अगम्य

सर हंटर -

या पूज्य ऋग्वेदाचा काळ अगम्य आहे.

मॅक्समूलर -

मानवजातीच्या पुस्तकसंग्रहातील वेद हे अत्यंत जुने ग्रंथ आहेत. (भा.श्रे.१३३)

८. अखंड ऋण

व्हॉल्टेअर-

यजुर्वेदाची एक प्रत जेव्हा **व्हॉल्टेअर** यास अर्पण करण्यात आली तेव्हा तो म्हणाला की- ''ही देणगी खरोखर अमूल्य असून त्याबद्दल पौर्वात्य राष्ट्रांचे पाश्चात्य राष्ट्रांनी अखंड ऋणीच राहिले पाहिजे.''

लेऑन डेलवॉस उत्साहाने म्हणतो -

''ग्रीस व रोम मधील प्रत्येक समरकाची योग्यता ऋग्वेदाच्या खालीच लागेल.'' (भा.श्रे.१३३)

९. मानवी अभिमानाची गोष्ट

मॅक्समूलरचे कळकळीचे सांगणे आहे की -

''इतर कोणत्याही भाषेतील ग्रंथाने जे काम झाले नसते ते वेदांनी जगाच्या इतिहासात केले आहे. सबब ज्याला ज्याला म्हणून स्वतःचा, पूर्वजांचा व आपल्या मानवजातीच्या इतिहासाचा अभिमान आहे त्या प्रत्येकाने वेदांचा अभ्यास करणे जरूर आहे.'' (भा.श्रे.१३४)

१०. स्त्रियांची ज्ञान साधना

प्रो. बेरर (वेबर?)-

ज्या काही मानवी मनाला अत्यंत कठीण वाटणाऱ्या विषयांचे विवेचन व उद्घाटन करण्यात ब्राह्मण मोठ्या उत्साहाने मग्न असत आणि वेदान्तासारख्या पवित्र विषयातील सिद्धान्त स्त्रियांपुढे मांडण्यात येऊन त्याही आपल्या उत्साहयुक्त कळकळीने व ज्ञान जिज्ञासेने त्या सिद्धान्ताच्या गूढ प्रदेशात शिरून व मर्म हुडकून काढून पुरुषासही विचारांच्या गांभीर्याने, खोलपणाने व वजनाने

आश्चर्यचकीत करून सोडीत- अशा त्या अतिप्राचीन काळाची प्रतिमा या ब्राह्मण-ग्रंथात उठलेली आपणास दिसते.'' (भा. श्रे. १३४)

११. सर्वात जुने व अजूनहि टिकलेले हिंदुराष्ट्र

एडिंबरो रिव्ह्यू मध्येही (आक्टोबर १८७२) एक लेखक म्हणतो :-

''जगाच्या उपलब्ध इतिहासात जी प्राचीन राष्ट्रे केवळ नाममात्रेवरून सांप्रत हयात आहेत, त्यांच्यामध्ये संस्कृतीचा अरुणोदय होण्यापूर्वीच या प्राचीन हिंदुराष्ट्राचा संस्कृतिसूर्य मध्याह्नी येऊन ठेपला होता! ज्याच्या प्राचीन संस्कृतीचे महत्वाचे अवशेष सांप्रत विद्यमान आहेत अशा जुन्या राष्ट्रात हिंदुराष्ट्र हे सर्वात जुने आहे. असे असूनही **सुसंस्कृति व सुधारणा या बाबतीत आजतागायत कोणत्याही राष्ट्राला हिंदुराष्ट्रास मागे टाकता आलेले नाही !**''

१२. हिंदुस्थान काय शिकवितो ?

मॅक्समूलर-

''मानवी अंतःकरणाच्या व बुद्धीच्या श्रेष्ठ वृत्ती व शक्ती

कोणत्या देशात पूर्णावस्थेत पोचल्या आहेत? सृष्टीतील व संसारातील अत्यंत महत्वाच्या गूढ प्रमेयांचा सूक्ष्म व खोल विचार कोठे झाला आहे? व प्लेटो, कँटप्रभृति तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांचे परिशीलन केलेल्या पडितांच्याही अध्ययनास सर्वस्वी पात्र होईल असा वरील गूढ प्रमेयांचा उलगडा कोठे झाला आहे? असे प्रश्न मला कोणी विचारले तर मी त्यास 'हिंदुस्थान ! हिंदुस्थान ! हिंदुस्थान !' असे एकच उत्तर देईन.

ग्रीक, रोमन व यहुदी या तीनच राष्ट्रांचे विचार, वाङ्मय व संस्कृति यांजवर युरोपियन राष्ट्रांचे आजपर्यंत पोषण झालेले असल्यामुळे त्यांचे आध्यात्मिक जीवन अपुरे, आकुंचित व खुरटे झालेले आहे. हे जीवन खरोखर परिपूर्ण, विशाल, सर्वांगीण मानवाचे आकलन करणारे व विश्वव्यापक करावयाचे असल्यास, किंबहुना त्यात नवीन व सनातन असे चैतन्य ओतून त्यास अजरामर करावयाचे असल्यास, आपण कोणत्या देशाच्या वाङ्मयाकडे धाव घ्यावी? असा मी मनाशी विचार करू लागलो तर भाग्यशाली भरतखंडच माझ्या

डोळ्यापुढे उभा राहतो.

भाषा, धर्म, पुराण कथा, कायदे, चालीरीती, प्राचीन कला, प्राचीन शास्त्रे वगैरे जे मानवी मनोबुद्धीचे निरनिराळे विकास व विलास आहेत त्यापैकी कोणत्याही एकाच्या विशेष अध्ययनास आरंभ केल्यावर **तुम्हाला आवडो वा न आवडो तुम्हास हिंदुस्थानाकडेच जाणे भाग पडेल!** कारण मानवी इतिहासाच्या सामुग्रीपैकी अत्यंत महत्वाच्या व **अत्यंत बोधकारक सामुग्रीचे भांडार** हिंदुस्थानात- केवळ एकट्या हिंदुस्थानातच- साठविलेले आहे.''

(India, what can it teach us? P. 45)

१३. प्रचंड ग्रंथसंपत्ती : काव्यमय

प्रो. मॅक्स डंकर -

''संस्कृतमधील काव्य भांडाराचा मुळीच ठाव लागत नाही. परंतु भारतीयांची नैसर्गिक प्रवृत्ती काव्यमय असल्याने त्यांच्या हातून इतके असंख्य काव्यग्रंथ निर्माण झाले, यात काय आश्चर्य? सध्या उपलब्ध असलेल्या ग्रंथसंख्येने जर आपण इतके मोहित झालो तर

(२१)

पुच्छविषाणरहित नरपशूंच्या धार्मिक अत्याचारास बळी पडून ज्यांची राखरांगोळी झाली, त्या ग्रंथांची नक्की संख्या आम्हास माहित झाली तर आमच्या आश्चर्यास सीमाच उरणार नाही.

नैसर्गिक काव्यप्रवृत्ती हीच या अफाट ग्रंथ संपत्तीचे कारण आहे.

* कायदेशास्त्र काव्यमय.
* ज्योतिषशास्त्राची उभारणी काव्याच्या पायावर.
* इतर विज्ञानशास्त्रांची भाषा काव्ययुक्त.
* धर्मशास्त्र काव्यवाणीने बोललेले.

सारांश कोणत्याही लेखनाचे कामी काव्याचा सहज लीलेने उपयोग करण्याचे त्यांस मुळीच जड जात नसे. जे ऋषी त्रिकाल सत्य असलेले वेद आपल्या सरळ, रसाळ, मोहक आणि काव्यरसाने थबथलेल्या वाणीने बोलले त्यांच्या वंशजास कवित्वशक्ती परंपरेने प्राप्त झाली असल्यास त्यात नवल ते कोणते?'' (भा.श्रे.१३८)

(२२)

१४. ८००० वर्षापूर्वी बाक्ट्रियात हिंदु राजा

कौंट जार्नस्टजर्ना -

''दबिस्तान नामक एक बाक्ट्रियन लेख सर विल्यम जोन्स यास काश्मिरात सांपडला होता. व तो पुढे त्यानी युरोपात नेला. या लेखात अनेक राजांची मोठी नामावली दिलेली असून त्यातील पहिला राजा बाक्ट्रिया देशात शिकंदराचे स्वारीपूर्वी ५६०० वर्षाचे सुमारास राज्य करीत होता; आणि हा राजा हिंदुच होता. यावरून ख्रि. पू. ६००० चे सुमारास म्हणजे पृथ्वीवर मनुष्यप्राणी निर्माण झाल्याचा जो काळ मध्ययुगीन युरोपियन ग्रंथकारांनी दिला होता. त्याचे आधी अनेक शतके भारतात असलेली आर्य संस्कृति किती श्रेष्ठतेस पोचली होती ते कळून येते.''(भा.श्रे१९)

(Theogony of the Hindus P. 134).

(२३)

प्राचीन राज्यपद्धती

१५. कलहात्मक राज्यपद्धतीची कारणे

प्रो. मॅक्स डंकर -

''राज्यपद्धती कोणतीहि असली तरी समाजाची आध्यात्मिक, नैतिक व सामाजिक ध्येये उच्च प्रतीची असतील, तर तेथील राज्यव्यवस्थाही त्याच ध्येयास अनुसरून प्रजेस सुखावह अशी होत असते. समाजात अशी ध्येये खेळत नसली म्हणजे राज्यपद्धती कितीही उत्तम असली तरी तेथील राज्यव्यवस्थेत व्यक्तिव्यक्तींमध्ये, पक्षापक्षांमध्ये व वर्गावर्गामध्ये, द्रव्यासाठी व हक्कासाठी **'चढाओढ'** हे गोंडस नाव मिळालेला कलह माजल्यावाचून राहत नाही.

युरोप व अमेरिकेतील राज्यपद्धती बहुतांशी लोकसत्तात्मक असूनही तेथे असा मोठा कलह माजून राहिलेला असतो, याचे तरी बीज हेच होय.'' (भा.श्रे.२९)

(२४)

(History of Antiquity VOL. II P. 18)

१६. प्राचीन हिंदुस्थानात

प्रो. मॅक्स डंकर -

''सत्तेच्या अधिष्ठानाचे दृष्टीने राज्यपद्धतीचे वर्गीकरण केले तर राजसत्ताक, महाजनसत्ताक, प्रतिनिधिसत्ताक, लोकसत्ताक, वगैरे तिचे भेद होतील, पण प्रजाजनांचे सुख व भरभराट ही एकच दृष्टी ठेवून विचार केला तर असा सामान्य सिद्धांत निघेल की -

* उच्च शीलाचे, उदारमनाचे, व्यापक सहानुभूतीचे, थोर सद्गुणांचे व श्रेष्ठ बुद्धिमत्तेचे लोकांस मात्र जी राज्यपद्धती श्रेष्ठपणास चढविते आणि
* शीलहीन, हलक्या मनाचे, संकुचित दृष्टीचे, दुराचरणी व बुद्धीहीन लोकास जी श्रेष्ठतेस चढू देत नाही; तीच राज्यपद्धती उत्तम होय.

ही कसोटी प्राचीन भरतखंडात लाविली असता, तेथील राज्यव्यवस्था उत्तम होती - 'पृथ्वीवरील सर्व राष्ट्रात प्राचीन भारतीय राष्ट्र, संस्था या दृष्टीने सर्वांहून श्रेष्ठ होते' असे कोणाचेही मत झाल्यावाचून राहणार

नाही.' (भा.श्रे.२९)

(History of Antiquity VOL. II P.18)

१७. भारत व युरोपची तुलना

स्ट्रॅबोने

नमूद करून ठेवले आहे की - **''प्राचीन भरतखंडात चोरीचे नावही नव्हते''** (भा.श्रे.३०)

डॉ. जॉन्सन -

''अत्यंत सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्राची राजधानी म्हणजे सैतानाचे माहेरघर असून, रात्री रस्त्यातून फिरणे म्हणजे मरणाची तयारी करणे आहे व परक्याचे घरी निजावयास जाण्यापूर्वी आपले मृत्युपत्र करून ठेवणे आवश्यक आहे,'' - असे ज्या काळाचे **डॉ. जॉनसनने** अत्युक्तीचे वर्णन केलेले आहे.- त्या काळी ''घराचे दरवाजे कां लावावयाचे व त्यास कड्याकुलपे कशासाठी घालावयाची? हेही हिंदू लोकांस माहीत नव्हते''

मेगॅस्थनीस -

याने असे लिहिले आहे की ''चंद्रगुप्ताच्या छावणीत एकंदर ४ लक्ष लोक असूनही तेथे दररोज होणाऱ्या

चोऱ्यांचा माल सरासरीने ३० रूपयाहून जास्त किमतीचा नसे. यावरून त्या काळाच्या पोलिसांच्या चोखपणाचीही साक्ष पटेल.''

इंग्लंडमध्ये व्हिक्टोरिया महाराणीचे कारकीर्दीपर्यंत व्यवस्थित पोलिसखाते अस्तित्वातही आलेले नव्हते ही गोष्टी लक्षात ठेवण्यासारखी आहे. (भा.श्रे.३१)

१८. लोकसत्ताक-संघ =

प्राचीन भारत

ले. कर्नल मार्क विल्कस -

''प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति हिंदूंच्या स्वप्नातही आली नव्हती. किंबहुना ती त्यांच्या राजकीय प्रकृतीस कधी मानवणारही नाही - असे पुष्कळ विद्वान म्हणत असतात. पण हे म्हणणे साफ चुकीचे आहे.

प्राचीन काळापासून हिंदुस्थानातले प्रत्येक गांव किंवा शहर म्हणजे एक लहानसे पण स्वयंपूर्ण लोकसत्ताक राज्यच असे. व सर्व हिंदुस्थान म्हणजे अशा छोट्या

स्वराज्यांचा एक प्रचंड संघच होता.''

(Historical sketches of the South of India VOL.I. P.119)

१९. व्यक्तिस्वातंत्र्य

'भरतखंडातील प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र होती' असे **एरियन** याने आदरपूर्वक म्हटले आहे.

२०. लोकसत्ताकाची बीजे

मिल-

'हिंदुस्थानची प्राचीन राज्यपद्धती व कायदे यामध्ये लोकसत्ताक राज्यांची बीजे स्पष्ट दिसत आहेत. असे **मिल** सारख्या दुराग्रही व अहंमन्य इतिहासकारासही कबूल करावे लागले.

२१. स्वयंपूर्ण लोकसत्ताक नगरे

सर चार्लस मेटकाफ -

यांनी तर या ग्रामसंस्थांचे मोठेच रसभरित गुणवर्णन केले आहे. ते लिहितात -

''या ग्रामसंस्थारूपी छोट्या लोकसत्ताक

राज्यांच्या बहुतेक सर्व गरजा गावातल्या गावात भागत. त्यांचेवर परकीय राजसत्तेचा शह कधीच बसला नाही. जेथे इतर सर्व गोष्टी क्षणभंगुर भासतात तेथे या ग्रामसंस्था मात्र सनातन दिसतात. एकामागून दुसरी अशी अनेक राजघराणी जमीनदोस्त झाली. एकामागून एक राज्यक्रांत्या अनेक होऊन गेल्या. पठाण, मोंगल, मराठे, शीख, इंग्रज वगैरेंच्या राजसत्ता आळीपाळीने या देशावर नांदल्या. पण या सर्व उलथापालथीत ग्रामसंस्था आपल्या पूर्ववत कायमच्या कायमच आहेत! या ग्रामसंस्थारूपी लहान लहान लोकसत्ताक राज्यांचा असा संघ बनल्यामुळेच हिंदूलोकांस राजकीय स्वातंत्र्य, स्वावलंबन व राजकीय सुख यांचा लाभ झाला आहे.''(भा.श्रे.३१.३२)

The Village Communities are little republies having nearly everything they can want wihthin themselves and almost independent of any foreign nation.

They seem to last where Nothing lasts. Dynasty after dynasty tumbles down revolution succeeds revolution and Pathan, Moghul, Marhatha, Sikh, English are all Mastesr turn,

but the Village Communities remain the same. This union of village communities each one forming a little state in itself, is in a high degree conducive to their (Hindoo) happines and to the enjoyment of a great portion of freedom and idependence. (Report of the Select Committee Vol III of the House of Commons 1832) (भा.श्रे.३१-३२)

मनुस्मृति

२२.ग्रामराज्ये

सर्व ग्रामराज्ये एका सूत्रात होती

''पण ह्या लहान लहान ग्रामसंस्था वाळूच्या कणाप्रमाणे पृथक् पृथक् असून त्यांचा एकजीव नव्हता असे कोणास वाटेल, पण खरी स्थिती तशी नव्हती.

-राजाने प्रत्येक गावावर एकेक, दहा किंवा वीस गावाच्या समुदायांवर एक याप्रमाणे अधिकारी नेमावे व त्यांनी एकमेकांशी चढत्या क्रमाने जबाबदारीने वागावे अशी पद्धत होती.'**-मनुस्मृति**(अ७/१२३.१२४)

''धर्मशास्त्र किंवा कायदे यांचे स्वरूप व

व्यापकता ही राज्यव्यवस्थेच्या बरेवाईटपणाची एक कसोटी आहे. भारतीयांच्या धर्मशास्त्राचा मुख्य ग्रंथ मनुस्मृति हा होय. याची रचना जशी साधी आहे; तसे त्यातील नियम दूरदृष्टीचे व शहाणपणाचे पूर्ण निदर्शक आहेत. हे नियम वारंवार बदलणारे नसूनहि ते समाजातील व्यक्तींच्या सर्व भिन्न भिन्न परस्पर संबंधास पुरतील इतके व्यापक आहेत.'' (भा.श्रे.३२)

२३. युरोपवर मनुस्मृतीचा प्रभाव

सर विल्यम जोन्स -

'मनुस्मृति ही ग्रीक स्मृतिकार **सोलन** किंबहुना **लायकर गस** या दोघांच्या कायद्याहूनही प्राचीनतर असली पाहिजे. क्रीट बेटातील प्राचीन कायदे मनूच्या धर्मशास्त्रासारखेच असल्याचे दिसून येते; व हेच कायदे **लायकरगस्ने स्पार्टा** मध्ये आणले असावेत.'- प्रस्तावना पृष्ठ १०ते१२ *(Houghton's institute of Hindu Law)*

दी बायबल इन इन्डिया-

नांवाचा ग्रंथ लिहिणाऱ्या लेखकाचे तर असे मत आहे की, ''इजिप्त, इराण, ग्रीस रोमन येथील कायद्याची

रचना मनुस्मृतीचेच पायावर केलेली आहे, व अजूनही युरोप खंडाच्या न्यायकचेऱ्यात मनुस्मृतीचेच प्राबल्य असल्याने दररोज दिसून येते.'' (भा.श्रे.३२)

The MANUSMRITI was the foundation upon which the Egyptian, The Persian, The Grecian, and The Roman codes of law were built, and the influence of MANU was still every day felt in Europe.

प्रो. विल्सन -

''डेसेमव्हेरेट याच्या आमदानीत ग्रीकानी भारतीयांच्या स्मृतींवरून आपले कायदे तयार केले असावे; व पुढे ग्रीक कायद्यापासून रोमन व रोमनपासून इंग्रजी कायदे रचण्यात आले.''

- (भा.श्रे.३३)

२४. खूप सुधारलेल्या लोकांचे नियम

प्रो. विल्सन -

''हिंदूंच्या स्मृतिग्रंथात समाजातील सर्व भिन्न भिन्न संबंध नियमित करणारे नियम दिले आहेत. हे नियम

प्रचलित असलेला समाज फारच सुधारलेला असल्यावाचून असे नियम अस्तित्वातच येणे शक्य नाही.'' (भा.श्रे.३३)

२५. मनुस्मृतीत - राजांनाही शिक्षा

कोलमन-

मायथॉलॉजी ऑफ हिंदूज ''नामक ग्रंथात (पृष्ट ८) **कोलमनने** असा अभिप्राय दिला आहे की,

''मनुस्मृतीच्या भाषेत- कायद्याच्या ग्रंथात आवश्यक असे- एक प्रकारचे गांभीर्य व उदात्तता असून त्यामुळे तीबद्दल मनात एक प्रकारचा आदरयुक्त दरारा वाटतो. ईश्वराखेरीज इतर सर्वासंबंधाने नियम सांगतांना मनुस्मृतीने अत्यंत स्वतंत्रता स्वीकारल्याचे दिसून येत असून खुद्द राजांचीही न्यायनिष्ठूरपणे तिने केलेली कानउघाडणी तर खरोखरच उच्च दर्जाची आहे.''

" The style of Manu has certain austere majesty that sounds like the language of legislation and extorts a respectfull awe. The sentiments of independence on all beings but God and harsh admontions even to kings are truly noble."

२६. मनुस्मृतीबद्दल आदर

मद्रास हायकोर्टाचे चीफ जस्टिस

सर थॉमस स्ट्रेज -

यांनी तर असे लिहीले आहे की; ''या शास्त्राचे अध्ययन केल्यास प्रत्येक इंग्रज कायदेपंडितांचा फायदा होऊन त्याच्या नुसत्या वाचनानेही त्यांचे मनात आदर व आनंद उत्पन्न झाल्यावाचून राहणार नाही.''

Hindu Law of Evidence will be read by every English lawyer with a mixture of admiration and delight; as it may be studied by him to advantage.

सांख्य दर्शन

२७. परिश्रम आणि गूढज्ञान

मिसेस मॅनिंग -

''मानवी जीवनाच्या अत्यंत गूढ तत्त्वांचा उद्बोध करून-ती सर्व जगास पटवून देण्यात सांख्यांनी जे परिश्रम केले ते केवळ अनमोल आहेत.....एकंदर विवेचनावरून असे वाटते की त्यांनी जे लिहिले आहे त्यापेक्षा त्यांचे

ठिकाणी पुष्कळच अधिक विचार शिल्लक होते.'' (भा.श्रे.१८३)

२८. सांख्याचा अनुवाद = उत्क्रांतिवाद

सर हंटर -

''विश्वाची उत्पत्ति व्यवस्थिती व उत्कर्ष यांचे जे विस्तृत विवेचन सांख्यांनी केले आहे त्याचाच केवळ अनुवाद हल्लीच्या उत्क्रांतिवाद्यांनी नवीन दृष्टीने व नवीन भाषेने केला आहे. व त्यापेक्षा यांची काही जास्त करामत आहे असे म्हणवत नाही.''

उपनिषदीय तत्त्वज्ञान

२९. बर्कलेचे तत्त्वज्ञान खुरटे

मॅक्समूलर -

''ज्याने बर्कलेचे तत्त्वज्ञान समजून घेऊन शिवाय उपनिषदे व ब्रह्मसूत्र यांच्यातील ज्ञान अधिगत केले आहे त्यास खात्रीपूर्वक असे सांगता येईल की उपनिषदे व ब्राह्मण

यातील तत्त्वज्ञानापुढे बर्कलेचे तत्त्वज्ञान अगदीच तुटपुंजे व खुरटे दिसते.'' (भा.श्रे.१८७)

३०. शांकरभाष्याची महती

सर विल्यम जोन्स -

''आचार्य भाष्यासारख्या सुंदर ग्रंथाचे एखाद्या युरोपियन भाषेत संपूर्ण भाषांतर झाल्याशिवाय तत्त्वज्ञानाचा इतिहास पुरा होणार नाही. प्रत्यक्ष सरस्वतीस सुद्धा आचार्य भाष्याची महती गाताना शीण आल्याखेरीज राहणार नाही.'' (भा.श्रे.१८८)

मॅक्समूलर -

''मीमांसा विवेचन पद्धतीने प्रथम पूर्वपक्ष, नंतर उत्तरपक्ष व शेवटी सिद्धान्त असतो. या पद्धतीबद्दल पाश्चात्यांना फार आश्चर्य वाटते. ''आजपर्यंत जगात चमत्कृतिजनक अशी बरीच काव्ये व ग्रंथ निर्माण झाले. परंतु या ग्रंथाची थोरवी काही अपूर्वच आहे. धन्य आहे त्या महाभागाची की - ज्याच्या बुद्धीतून असे पुस्तक उदयास

आले. प्रत्येक प्रकारच्या ज्ञानप्रसारास असले साधन उत्पन्न करून ते इतके सुव्यवस्थित सोपे व सर्वसंग्राहक बनविणाऱ्या हिंदूंच्या कल्पक बुद्धीची तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे.'' (भा.श्रे.१८८)

३१. उपनिषदांचा अभ्यास हेच परमो□ा सुख

शोपेन हॉवर जर्मन तत्त्वज्ञ -

''ज्यू-धर्मातील अंधश्रद्धायुक्त समजुती व वेडगळ समज यांचे मनावरचे कीट वाढले होते. अशा अंधश्रद्धेच्या पायावर असलेल्या तत्त्वज्ञानाने जो मनाला पंगुपणा आला होता, तो सर्व उपनिषदांच्या अवगाहनाने नाहीसा होऊन मन कसे प्रफुल्लित व जोमदार होते ते पहा! सर्व जगात उपनिषद् ग्रंथांच्या अभ्यासापेक्षा दुसरा कोणताही अभ्यास फलदायी व मनाच्या उच्चस्थितीला नेणारा नाही. माझ्या आयुष्यातील उपनिषदांचे अध्ययन हेच श्रेष्ठसुख व मरणोत्तर प्राप्त होणारे आत्यंतिक सुखही

तेच होय.'' (भा.श्रे.१८९)

३२. कुठे ग्रीक आणि कुठे आर्य !

एलफिंस्टन -

''हिंदूंचे सर्व विषयातील ज्ञान बरेच वाढलेले होते. तरीपण ईश्वरस्वरूपाच्या ज्ञानाचा जो भव्य दीप भारतीय आर्यांजवळ होता व ज्याच्या साह्याने त्यांनी सर्व आध्यात्मिक प्रदेश हिंडून त्यात अभूतपूर्व व दुस्साध्य शोध लावले त्यांचा एखादा मंद किरण सुद्धा विशाल व गाढ ग्रीक विद्वत्तेला मिळालेला नाही. तेणे करून तिला संशयरूप अंधःकार व नास्तिकवादरूपी खाचखळगे यातून मार्ग काढणे फार कठिण झाले.''(भा.श्रे.१८९)

औषधी शास्त्र

३३. आरोग्य-रक्षक मनु

लॉर्ड ॲपथिल, मद्रासचे गव्हर्नर -

''हिंदुशास्त्रात आरोग्याचे नियम हल्लीप्रमाणे सुधारलेल्या

स्वरूपाचे होते. प्रख्यात धर्मशास्त्रकार मनु यांची आरोग्यरक्षक म्हणून फार दूरवर कीर्ती पसरली आहे. जगातील अतिशय नामांकित आरोग्यसुधारक माणसांमध्ये मनूचा दर्जा फारच उ□ा आहे. (भा.श्रे.१९२)

३४. आर्य वैद्यकाचा विस्तार

सर विल्यम हंटर -

''आर्य वैद्यक इतर पूरक शास्त्रांशी फारच एकरूप झालेले होते. शरीररचना-अवयव- जोड- स्नायु- रक्तवाहिन्या व शरीर घटक (टिश्यू)- धातू, यांचा आर्य वैद्यकात विस्तृत विचार झालेला आहे. हिंदूंच्या सर्वमान्य सर्व वस्तूंचा समावेश झाला आहे. त्यांची नामावळी बेसुमार विस्तृत झाली असून **''यातील बरीच नावें युरोपियन वैद्यकाने उचलली आहेत.''** औषधक्रिया खुबीदार असून औषधांच्या वर्गीकरणाचे व सेवनाचे नियम फारच सूक्ष्म व लांबलचक आहेत. आरोग्य- अन्नसेवन व आहार याकडे फार बारीक दृष्टि दिलेली आहे.'' (भा.श्रे.१९२)

३५. भरभराटीचे कारण

प्रो. विल्सन -

''भारतीय आर्यांचे रोगनिदान अगदी तंतोतंत असून लक्षणांची व्याख्या व पृथक्करण सूक्ष्मगामी आहे. - शस्त्रक्रियाही बरीच वाढली होती व औषध योजनेत तर त्यांचा हातखंडाच असे, कारण की, नैसर्गिक अनुकूलतेमुळे कोणत्याच औषधीची कधी वाण नसे. शिवाय त्यांची चौकस बुद्धी, मेहनती स्वभाव सूक्ष्म व खोल दृष्टी इत्यादी गुणांमुळे व वनस्पतींच्या विपुलतेमुळे आयुर्वेदाची फारच भरभराट झाली.''

शस्त्रक्रिया

३६. आयुर्वेदातील शस्त्रक्रिया

वेबर, एलफिंस्टन व मॅनिंगबाई -

''आर्य वैद्यककाली शस्त्रक्रिया फार पुढे गेलेली असून कित्येक बाबतीत चालू काळी सुद्धा सुधारणा झालेली

नाही असे म्हणावे लागते. नाक-कान इत्यादी अवयव कापून नवे बसविणे ही सध्या कष्ट साध्य असलेली शस्त्रक्रिया त्या काळी सहज करीत असत. या कामी लागणारी शस्त्रेसुद्धा विलक्षण तीक्ष्ण, नाजूक व सूक्ष्म असत.'' (भा.श्रे.१९३)

३७. नासिक प्रत्यारोपण

(१)''इ.सन पूर्व एक हजार वर्षे पूर्वी भारतातील कुम्भकार जातीचे लोक कापलेले नाक पुनः शल्यचिकित्सेद्वारा नवे करून देत असत.''- **इनसायक्लोपिडिया ब्रिटानिका** (नवनीत सप्टेंबर १९८३ पा.२१)

वीने -

(२) वीने नावाच्या एक फ्रेंच प्रवाशाने कांगडा येथे जाता येताना अनेक लोकांनी आपली कापलेली नाके जोडून नवीन केलेली पाहिली असल्याचा उल्लेख केला आहे. (नवनीत पा. २२)

(३) सरकारी गॅझेट

सन १७९३ मद्रास सरकारी गॅझेट मध्ये नासिका प्रत्यारोपणाच्या एका शल्य चिकित्सेचा उल्लेख ''एकुलते एक ऑपरेशन'' म्हणून केला आहे. आणि या ऑपरेशनचे वर्णन **जंटलमन्स मॅगेझिन** या लंडन येथील नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहे. (१९८३नवनीत पा२३)

३८. प्लॅस्टिक सर्जरीचे मूळ

डॉ. बारियन -

''इटालीयन प्लॉस्टिक सर्जरी मूळरूपात भारतीय विद्याच असून ती व्यापारी आणि नाविकांच्या बरोबर येथे आली.''

यानंतर १९ व्या शतकातील अनेक जर्मन वैद्यांनी भारतीय आणि इटालवी या दोन्ही पद्धतीच्या आधाराने प्लॅस्टिक सर्जरीची प्रगती केली.(नवनीत पा.२२ सप्टें.१९८३)

३९. शरीरशास्त्राची सूक्ष्मता

प्रो. वेबर -

''वेदकालीन मानवेतर प्राण्यांच्या शरीरशास्त्राचे बरेच ज्ञान आर्य लोकांस अवगत होते कारण प्रत्येक अवयवास

भिन्न व योग्य शब्द सापडतो आणि ही गोष्ट शास्त्राच्या वाढीशिवाय होणे शक्य नाही. मग मनुष्याच्या शरीरशास्त्राबद्दल तर विचारावयासच नको. **अमरकोशामध्ये मानवी शरीर व रोग** या संबंधी जे शब्द आढळतात त्यावरून वरील अनुमान काढणे भाग पडते.'' (भा.श्रे.१९४)

४०. आयुर्वेद : अरबी भाषेत

प्रो. विल्सन -

''संस्कृतमध्ये वैद्यक ग्रंथांची बरीच मोठी संख्या असून त्यापैकी प्रख्यात ग्रंथांची अरबी भाषेत भाषांतरे झाली आहेत. या भाषांतर ग्रंथामध्ये वैद्यकशास्त्राच्या शस्त्रक्रियेसुद्धा सर्व शाखांचा उहापोह आहे. तसेच बिनचूक निरीक्षण आणि सप्रमाण, यथान्याय व यथाशास्त्र औषध योजना दिलेल्या आहेत.''

४१. आयुर्वेदाचे स्वदेशी पुनरागमन

लॉर्ड आथ्थिल मद्रास गव्हर्नर -

''प्राचीन आर्यावर्तातून मुसलमान लोकांनी वैद्यक शास्त्राचे

ज्ञान स्वदेशी नेले होते. ते त्यांनी हिंदुस्थानावर स्वारी करून येथे राज्य करण्यास आल्यावर परत आणले. मध्यंतरी पुष्कळ शतके या ज्ञानाचा लोप झाल्यासारखा वाटत असे. परंतु मुसलमानांच्या आगमनाने ते ज्ञान परत स्वदेशी आले.''(भा.श्रे.२००)

४२. मागमूसही नाही

लॉर्ड ऑथ्थिल मद्रास गवर्नर -

''युरोपखंड अगदी रानटी स्थितीत होते. त्यावेळी हिंदुस्थानात उपचारात्मक व प्रतिरोधात्मक दोन्ही पद्धतींची औषधे तयार करण्याची तत्त्वे सर्वत्र मशहूर झाली होती. वैद्यकशास्त्र हिंदुस्थानात तयार होऊन नंतर त्याचा प्रवेश युरोपात झाला ही गोष्ट सर्वांना अवगत आहे की नाही कोण जाणे ! परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, युरोपातील वैद्य १७ व्या शतकापर्यंत अरबी ग्रंथांवरून हे शास्त्र शिकत व स्वतः अरबांनी ते हिंदुस्थानातून नेले होते. ही प्राचीन सुधारणा पूर्वेकडून पश्चिमेस गेली असता त्या सुधारणेच्या जन्मभूमीत - आर्यावर्तात तिचा मागमूसही राहू नये हे केवढे आश्चर्य!'' (भा.श्रे.१९५)

४३. शिष्याने गुरूस शिकविले

लॉर्ड आथ्थिल -

''मध्यंतरीच्या अवनतीच्या काळात भारतातील सर्व लोकहितकारी गोष्टी नष्ट झाल्या, त्यांचा अवशेष देखील शिल्लक राहिला नाही. त्यामुळे - हिंदुस्थानातील लोकांस त्या नवीन वाटत असून ब्रिटिश अंमलाबरोबर आलेल्या पुष्कळ गोष्टीबरोबर वैद्यकशास्त्रही ब्रिटिशांनी आणले असे वाटते - परंतु खरी गोष्ट अगदी उलट असून -

शिष्यावर गुरूस शिकविण्याची पाळी आली आहे, एवढेच नवीन आहे.

काळाच्या असंख्य लीलांपैकी ही एक आहे, यापेक्षा दुसरे काय?''

४४. अवनतीचा फेरा

लॉर्ड ऑथ्थिल मद्रास गव्हर्नर -

''इतिहासकार व प्राचीनवस्तुसंशोधक यांच्या परिश्रमाने या गोष्टी प्रकाशात येऊन प्राचीन भारताचे ज्ञानवैभव

(४५)

केवढे विशाल होते ! पण अवनतीच्या फेऱ्यात सापडल्यामुळे किती तरी हानी होते ! समर्थाचे पदरी केवढा दीनपणा येतो ! या सिद्धान्ताचे स्पष्टीकरण पहावयास मिळते.''

''या जगात नवीन असे काही नाही. हल्ली जे आहे ते प्राचीन काळी होते फक्त स्वरूप भिन्न असेल अथवा लौकिक ज्ञान समजूत सर्वसामान्य नसेल एवढाच फरक. सर्वस्वी नवीन असे कोठेही आढळणार नाही. याच तत्त्वाचे सत्यत्व रोगप्रतिबंधक पद्धतीत दृगोचर होते.''

०००

गणित

४५. हिंदूंचे गणित शास्त्र

जन. कनिंगहॅम - ''भारतीयांचे प्राचीन गणितशास्त्र इतके पूर्णावस्थेत पोचले होते व ज्योतिष-विषयक गणित तर ते इतके बिनचूक करीत की सूर्य चंद्राचे

(४६)

गमनमार्ग व गति ही त्यांनी अचूक मापली होती.'' - जन. कनिंगहॅमलिखित शिखांचा इतिहास (भा.श्रे.१२)

४६. शून्य' : जगाला देणगी

पूर्वीपासून आतापावेतो होत असलेला गणितादि सर्व ज्ञानशाखांचा विस्तार, किंवा जगातील सर्व सुधारणा ज्या अंक गणितातील शून्यावर आधारित आहेत ते '**शून्य**' भारताने जगाला विनामूल्य दान दिलेले आहे.

खरोखर पाहतां - संशोधनाच्या पेटंटची आधुनिक संकल्पनाच चुकीची आहे. जगातील कोणत्याही देशाने संशोधन केलेले असो, ते सर्व ज्ञानविज्ञान सर्व मानवांचे आहे. ही भारतीय धारणा आहे. समजा 'पेटंट' ची व्यवस्था बरोबर असेल तर भारताला 'शून्य' या अलौकिक संशोधनासाठी पेटंट मिळालेच पाहिजे. प्रत्येक राष्ट्राने पेटंटचा महसूल भारताला दिला पाहिजे.

४७. लिपी व दशांश पद्धती

श्लेजेल जर्मन चिकित्सक -

''मनुष्याने आजपर्यंत जे जे शोध लावले त्यापैकी

(४७)

लिपीचा शोध पहिल्या प्रतीचा असून त्याच्या खालोखाल दशांश पद्धतीचा आहे, असे इतिहासकारांनी मानलेले आहे. यापैकी लिपीप्रमाणेच दशांश पद्धतीही हिंदूंचीच कल्पना आहे असा सर्वसंमत सिद्धान्त आहे.'' (भा.श्रे.२०३

विज्ञान

४८. भारताचे जगावर ऋण

प्रो. मॅकडोनल -

''विज्ञान शास्त्रातसुद्धा युरोपखंड भारतभूमीचे अत्यंत ऋणी आहे. अंकपद्धतीचा फार मोठा शोध प्रथम लावून आर्यांनी जगावर उपकार केलेले आहेत. कारण ही पद्धत जगाने भारतापासून उचललेली आहे.''

''त्यानंतर मोजमापाच्या दशांशपद्धतीसुद्धा भारतीयांनीच शोधून काढली हिचा परिणाम केवळ गणितशास्त्राच्या वाढीवर झाला नसून जगातील सर्व सुधारणांवर व संस्कृतींवर झालेला आहे. या गोष्टीची थोरवी मानावी तेवढी थोडीच होणार आहे.

(४८)

आठव्या व नवव्या शतकात हिंदूंपासून अरबांनी ही शास्त्रे स्वदेशात नेली नंतर ती अरबांबरोबर पाश्चात्य राष्ट्रात आली. याच कारणाने बीजगणितास अरबी नाव मिळाले पण त्याची खरी उत्पत्ती हिंदुस्थानातचआहे.

भूमिती

४९. ज्योतिष-विषयक कोष्टके

बेली -

''हिंदुस्थानात भूमितीच्या साह्याने तयार केलेली ज्योतिष-विषयक कोष्टके होती. परंतु ती केव्हा तयार झाली याचा अंदाज लागत नाही. - फार प्राचीन काळी प्रत्यक्ष वेध घेऊन ती तयार केलेली असावीत व तो प्राचीन काल म्हणजे ख्रिस्तापूर्वी ३ हजार वर्षांचा असला पाहिजे'' - **बेली,** वगैरे विख्यात ज्योतिर्विद (भा.श्रे.२०६)

५०. त्रिकोण आणि वर्तुळ

एलफिस्टन-

''त्रिकोणाचे क्षेत्रफळ त्याच्या बाजूंनी व्यक्त करता येते -

ही हिंदूंस पूर्ण अवगत असलेली गोष्ट **क्लॅवियसने** युरोपात प्रसिद्ध करीतपर्यंत कोणास माहीत नव्हती.

त्याप्रमाणे त्रिज्या व परीघ यामधील परस्पर प्रमाण हिंदुलोक ज्या मापनाने मोजीत ते हल्लीच्या नवीन पद्धतीनेही तंतोतंत जुळते.

गेल्या शतकापर्यंत या गोष्टी युरोपियनास माहीत नव्हत्या त्याच हिंदुलोकास हजारो वर्षांपूर्वी माहीत असाव्या - यापेक्षा त्यांची श्रेष्ठता सिद्ध करण्यास आणखी कोणता पुरावा पाहिजे?'' (भा.श्रे.२०६)

बीजगणित

५१. भास्कराचार्यांचे बीजगणित

एडिम्बरो रिव्ह्यू -

या मासिकातील माहिती -

$$ax^2 + bx+c = 0$$

(अ क्ष^2+ब क्ष+ क = ०)

ही पूर्ण वर्गात्मक संख्या 'क्ष'च्या कोणत्या किमतीने

होईल?'' या प्रश्नाचा मजेदार इतिहास -

डायफॅन्टस् -

याने हा प्रश्न सोडविण्याचा थोडाफर प्रयत्न केला.

नंतर **फेरेमॅट** ***Feremat*** -

याने १७ व्या शतकात त्याच पद्धतीत आणखी फरक करून तो प्रश्न इंग्रजी बीजगणित तज्ञाकडे पाठविला.

यूलर (*Euler***)-**

शेवटी त्याचे समाधानकारक पूर्ण उत्तर प्रख्यात **यूलर** या गणित-तज्ञाने दिले.

परंतु- शेवटी यूलरची आणि भास्कराचार्यांची रीत एकच आहे असे आढळून आले.''

एडिम्बरो रिव्ह्यू -

पुढे त्याच मासिकाच्या २९ व्या भागाच्या १५३ पानावर असे म्हटले आहे की -

भास्कराचार्यांनी जे उत्तर दिले आहे तेच **लॉर्ड ब्रॉंकर** याने इ.स. १६५७ साली स्पष्ट करून सांगितले. आणि त्याच प्रश्नाचे सामान्य उत्तर १७६७ साली **डीलाग्रांज** याने दिले. ते **ब्रह्मगुप्त** याने दिलेल्या

उत्तरापेक्षा मुळीच निराळे नाही.'' - (भा.श्रे.२०९)

५२. भारतीय रीती : सोप्या

एलफिस्टन् -

''हिंदू व ग्रीक बीजगणिताच्या विद्वानांत जो फरक आहे तो नवी शोधांच्या बाबतीत नसून रीतींच्या सोपेपणात आहे. हिंदूंची बीजगणितातली सोपी आवडती रीत होती तिचा इ.सन १६२४ पर्यन्त जगास पत्ताही नव्हता. ती प्रथम **बाचेट डी मेझेरिक** याने युरोपात प्रसिद्ध केली. **यूलर** नेही हिचाच अंगीकार केलेला होता.'' (भा.श्रे.२०९)

५३. वैदिक गणित सूत्रे

भारतीकृष्ण तीर्थ -

जगन्नाथपुरीचे शंकराचार्य श्री भारतीकृष्ण तीर्थ यांनी वैदिक गणिताची १६ सूत्रे तयार केली आहेत. (१९ वे शतक) तिचाही प्रसार इंग्लंडमध्ये सुरू झाला आहे हेही लक्षणीय आहे. ती फार सोपी असून

मोठमोठी कूट गणिते चटकन सोडविण्यास त्या सूत्रांचा उपयोग होतो. - विश्वपुनर्निर्माण संघ, तेलंखेडी नागपूर.

व्याकरण

५४.भाषाशास्त्र

प्रो. विल्सन -

वेदांवरील स्वरबोधक प्रातिशाख्यासंबंधाने म्हणतो -

''इतर कोणत्याही राष्ट्राच्या वाङ्मयात मानीव भाषाशास्त्राच्या स्वरूप लक्षणाचे इतके सूक्ष्म, व्यापक, खोल आणि विस्तृत विवेचन झालेले नाही. जसे-

(१)स्वरशास्त्र (२)स्वर व व्यंजनांचे वर्गीकरण.

(३)शब्दव्युत्पति (४)शब्दजातिभेद, वगैरे.

(भा.श्रे.१३५)

५५. युरोप १५०० वर्षे मागे

आग्रा कॉलेजचे मुख्याध्यापक व प्रसिद्ध शब्दव्युत्पत्तीचे शास्त्रज्ञ **थॉमसन** यांच्या मते -

''संस्कृतातील व्यंजनव्यवस्था अपूर्व असून मानवी

बुद्धिमत्तेच्या विलासाचा तो एक उत्कृष्ट मासला आहे. युरोप या बाबतीत अशा विज्ञानशास्त्र प्रकर्षाच्या १५०० वर्षे मागे आहे व सर्व ध्वनींची वाचक अशी अक्षरे इंग्लिश भाषेत नाहीत.'' (भा.श्रे.१३६)

रेव्हरंड वॉर्ड -

''आर्याच्या शब्दव्युत्पत्तिशास्त्राने तर इतर प्राचीन व अर्वाचीन राष्ट्रांवरही मात केली आहे.''

पाणिनी

५६. भव्य प्रासाद मंदिर

प्रो. वेबर -

पाणिनीचे ग्रंथ उघडताच असे वाटते की आपण एखाद्या भव्य प्रासादात शिरलो आहो. त्या भव्य मंदिराच्या द्वारतोरणावरील कर्त्याचा नामलेख पाहिला म्हणजे मन क्षणभर आश्चर्याने व कौतुकाने भरून येते. भाषासृष्टीतील सर्व प्रसंगांचे यथायोग्य व समर्पक स्पष्टीकरण केलेले पाहून त्या पुरुषाची आश्चर्यकारक कल्पकबुद्धि व साधनसामुग्रीचे सखोल व परिपूर्ण आकलन, याविषयी

पूर्ण खात्री पटते व मनावर त्यांच्या बुद्धिप्रकर्षाबद्दल कौतुक-आदराचे फार वजनदार दडपण पडते.'(भा.श्रे.१३६)

५७. प्रयत्न व कल्पकतेची परमसीमा

प्रोफेसर हंटर -

१) विधानांचा बिनचुकपणा,

२) धातुपृथक्करणाची परिपूर्णता,

३) शब्द घटनातत्त्वांची शुद्धता.

या तीन बाबतीत जगातील सर्व व्याकरण ग्रंथात पाणिनीचा ग्रंथ अत्यंत श्रेष्ठ आहे. कित्येक ठिकाणांची थोडी दुर्बोधता सोडून दिली तर बीजगणितासारखी परिभाषा निर्माण करून आपल्या ग्रंथात जो खोचदार संक्षिप्तपणा आणला आहे. तो तर केवळ निरूपम आहे.

मानवीय प्रयत्नाने व कल्पकतेने केवढी उज्वल कामगिरी करता येते याचे संस्कृत भाषेतील सर्व गोष्टींचा तांत्रिक पद्धतीने जो मेळ घालून दिला आहे, त्यावरून प्रत्यंतर येते.'' (भा.श्रे.१३६-१३७)

५८. आर्यांचा हात धरण्याचे साहस नाही

मॅक्समूलर - व्याकरणातील पृथक्करण व मानवी भाषाशास्त्र तत्त्वांची मांडणी या दोन बाबतीत प्राचीन आर्यांचा हात धरण्याचे साहस व योग्यता कोण्याही अर्वाचीनाच्या अंगी नाही. (भा.श्रे.१३७)

५९. कोशग्रंथ

रेव्हरंड वार्ड - प्राचीनकाळी संस्कृत भाषा किती परिणतावस्थेत पोचली होती हे कोशग्रंथावरून स्पष्ट दिसून येते. आणि त्याबद्दल हिंदू विद्वानलोक अत्यंत थोर आदरास पात्र आहेत. (भा.श्रे.१३८)

रामायण

६०. रामायण आणि ग्रीक महाकाव्ये

मोनियर विल्यम

मोनियरसारख्या आंग्लपंडिताने असे म्हटले आहे की,

''या दोन ग्रीक महाकाव्यांना रामयण व महाभारत यांच्या पंक्तीस केव्हाच बसविता येणार नाही. त्यांची तुलना करणे, म्हणजे नगाधिराज हिमालयातील बर्फाच्छादित प्रदेशात उगम पावून ठिकठिकाणी लहान मोठ्या

नद्यानाल्यांच्या संयोगाने विस्तृत होणाऱ्या, काही ठिकाणी अफाट उथळ पात्रातून वाहणाऱ्या, तर कित्येक ठिकाणी भिन्न भिन्न दिशांकडे जाणाऱ्या, खोल, अनेक प्रवाहात रूपांतरित होणाऱ्या 'गंगा-यमुना' या सारख्या महानद्यांना व 'अँटिका' आणि 'येसाली' प्रांतातील डोंगरी ओढ्यांना एकाच मालेत ओवण्यासारखे आहे.''

''अत्यंत विशुद्ध भावनेशी पूर्ण परिचय इत्यादी गुणांनी जगांतील कोणत्याही भागात कोणत्याही काळी निर्माण झालेल्या अत्यंत सुंदर व मनोरम काव्यामध्ये रामायणाची योग्यता फारच मोठी आहे. निसर्गप्राप्त वाढीने भरारलेल्या विस्तारलेल्या उपवनांची उपमा रामायणास दिल्यास खरोखर काही वावगे होणार नाही. गोड व सुंदर उपदेशपर श्लोक हीच कोणी अच्छोदकाची सरोवरे परस्परान्वयी विस्तृत व उदात्त कथाभाग ही सर्व वृक्षराजी; अशाप्रकारची ही उपमा किती तरी सार्थ होणार आहे.

बरे रामचरित्र तर किती उत्तम रीतीने रेखाटले गेले आहे! रामचरित्रात पहिलेपासून अखेरपर्यंत जे निस्वार्थी वर्तन दृगोचर होत आहे. त्यावरून त्याची मानुषी

(५७)

जीवनक्रमाबद्दल मनात मोठी शंका येऊन हा खरोखर परमेश्वरी अंश असला पाहिजे अशी मनाची समजूत होते. त्याच्या अतिमानुष कृत्यांनी कधी कधी आमच्या मनाची मोठी चमत्कारिक स्थिती होऊन काही वेळ तर मन केवळ भांबावून जाते, परंतु असे प्रसंग फार वेळ टिकत नाहीत. निदान पूर्व भागात तरी एखाद्या शूर उदारमनस्क पवित्र व सद्गुणी मनुष्यापेक्षा कवीने जास्त असे रामचरित्रात मुद्दामच दाखविले नाही. आज त्यांचे प्रेम, शौर्य, औदार्य निर्लोभता, पित्राज्ञाप्रामाण्य, विमल पत्नीप्रेम, सहोदर प्रेम व क्रोधमय विचारांचा पूर्ण अभाव इत्यादी गुणांची मात्र जितकी तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे. आपल्या सापत्न मातेच्या क्रोधास जेव्हा राम बळी पडतो तेव्हा त्याच्या मुखावाटे एकही रागाचा शब्द निघत नाही. जेव्हा त्याचा पिता त्यास वनवासात पाठवण्याचे ठरवितो, तेव्हा तो 'हूं का चूं' सुद्धा करीत नाही.आपल्या पित्याच्या माथी प्रतिज्ञाभंगाचे पाप येण्यापेक्षा आपल्या स्वतःच्या सुखाची होळी करण्यास तो तयार होतो. व सीतेविषयी तर बोलावयासच नको; कारण

(५८)

ती केवळ गृहलक्ष्मीच होय व तीमध्ये सद्गुण मूर्तिमंतच अवतरले होते असे दिसते.'' (भा.श्रे.१४२)

महाभारत

६१. महाभारताची थोरवी

डॉ.हेंसलर

नामक अमेरिकन पंडित म्हणतो की, ''दैवी स्फूर्तीने भारलेले प्राचीन आर्यावतातील अत्यंत थोर महात्मे यांनी जो महाभारत नामक ग्रंथ निर्माण केला आहे, त्याच्या इतका थोर ग्रंथ आजपर्यंत माझ्या पाहण्यात दुसरा नाही. व माझ्या पूर्व आयुष्यातील अनुभवावरून मी असे म्हणतो की, या ग्रंथाने मला जितके वेड लावून सोडले आहे, तितके वेड मला इतर कोणत्याही ग्रंथाने पूर्वी लागले नाही.''

''या ग्रंथाचा अहर्निश अभ्यास करून मी त्यातून एक हजारावर उतारे घेऊन माझ्या पुढील आयुष्यातील अभ्यासाकरिता मांडणी केली आहे.''

''महाभारत म्हणजे एक अभिनव सृष्टीच

(५९)

आहे असे मला वाटते व त्यातील सत्पक्षप्रीती, ज्ञान, चातुर्य व सत्य इत्यादी गुणसमुदायाचे वर्णन वाचून तर मी अगदी तल्लीन होऊन जातो परंतु एवढ्यानेच त्याचा मोठेपणा संपला असे नाही. तर माझ्या मताने परमात्मा व जगदुत्पत्ती या संबंधी जे काही सिद्धान्त बांधले होते, तेच या ग्रंथात सुंदर व स्पष्ट भाषेत सांगितलेले पाहून मला या ग्रंथाबद्दल फारच आदर वाटू लागला व 'याची थोरवी किती गाऊ अन् किती नाही' असे मला होऊन गेले आहे.'' (भा.श्रे.१४३)

६२. विश्वाचे कल्याण इच्छिणारे महाभारत

बाबू पी. सी. रॉय -

यांनी मोठ्या नेटाने महाभारताचे इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध करण्याचे काम चालविले होते व त्यावेळी त्यास अमेरिकेतून **जेरेमिआकर्टीन** नामक मानव वंशशास्त्रज्ञाकडून असे पत्र आले की -

जेरेमीआकर्टीन - ''महाभारताचे २४ भाग मी साद्यंतपणे व काळजीपूर्वक नुकतेच वाचून संपविले आहेत. व

(६०)

त्यावरून माझी खरोखरच अशी समजूत झाली आहे की, या ग्रंथाइतका श्रेष्ठ ग्रंथ दुसरा नाही; व यापासून मला जेवढा आनंद झाला तेवढा इतर कोणत्याही ग्रंथामुळे आजन्मात झाला नाही. आर्यांच्या बुद्धिमत्ते विषयी व खऱ्या शीलाविषयी या ग्रंथवाचनाने सर्व लोकांच्या नेत्रात चांगलेच अंजन पडेल.

तुम्ही जे कार्य हाती घेतले आहे त्यायोगे केवळ हिन्दुस्थानचेच कल्याण होईल असे नाही, तर सर्व आर्य वंशाचे कल्याण होणार आहे. महाभारत ही एक फार विशाल खाण आहे व तीमधील संपत्तीचा अदमास अजून जगाला लागलेला नाही. यातील रत्ने जसजसी बाहेर येतील तसतसे याचे महत्व जगास कळू लागेल. या ग्रंथातील माहितीने आर्यांचा इतिहास कळावा अशी ज्यास तीव्र लालसा आहे त्यांचे समाधान होईल! व दीन दुबळा मानव आणि अत्यंत शक्तिमान् सर्वव्यापी परमात्मा यांचे काय नाते आहे, याचाही बोध

स्पष्टपणे यावरून होणार आहे.-(भा. श्रे १४४)

६३. व्यास आणि होमर

सानृहिलेर बार्थोलेमी

१८८६ च्या सप्टेंबरच्या अंकात **सानृहिलेर बार्थोलेमी** नामक एक फ्रेंच मासिककार म्हणतो की, -

''सुमारे १००वर्षांपूर्वी **विल्किन्स** नावाच्या गृहस्थाने महाभारतातील काही वेचे छापून प्रसिद्ध केले, आणि भगवद्गीतेच्या प्रसंगाने या प्रचंड ग्रंथाचा परिचय जगास करून दिला. या ग्रंथाचा भव्यपणा ऐकून सर्व पाश्चात्य जग थक्क झाले. होमर हा महाभारतकार व्यास यांजपुढे कःपदार्थ आहे, असे सर्व लोक मानू लागले व आर्यावर्त ग्रीसपेक्षा श्रेष्ठ आहे अशी सर्वांची खात्री झाली.'' - **सानृहिलेर** (भा.श्रे.१४४)

६४. प्लेटोपेक्षा व्यासांचा मोठेपणा

प्रो. हिरेन -

भरतखंडांत विद्वानांचे तत्त्वज्ञान सामान्य जनसमूहाचे धर्मसंकल्पनेत पूर्णपणे मिसळून गेले आहे. ईश्वराचे एकमेवाद्वितीयत्व व सृष्टिकर्तृत्व, आत्म्याचे अमरत्व व जीवांची कर्मबद्धता ही भारतीय तत्त्वज्ञानातील चार

मूलतत्त्वे सामान्य लोकांच्या धर्माचीही मूलतत्वे बनली आहेत.

ज्या पुनर्जन्म तत्त्वाचा **मोझेस** ने मुळीच उल्लेख केलेला नाही. किंवा केला असेल तर फारच संदिग्ध व अस्पष्ट केला आहे. तसेच ईश्वराचे जे एकत्व व सर्वशक्तिमत्व अनेक देवतावादी **ग्रीक** व **रोमन** सामान्य जनसमूहास किंवा दैवी **भिथ्रेइक धर्मशास्त्रकारासही** अज्ञात होते ते तत्त्व गंगानदीच्या तीरावरील ऋषींनी भरतखंडातील सगळ्या जनतेस पूर्वीच पटविले होते. शिवाय पापाचरणाबद्दल फार भयंकर शासन होत असे. हा सिद्धांत सामान्य जनसमूहाचे मनात ठसवून त्यांची पापभीरूता जाज्वल्य राखण्याचे कामी व्यासांनी प्लेटोवरही ताण केली आहे.''

६५. सर्व ज्ञानशाखांत संपन्नता

प्रो. हिरेन

यांनी असा अभिप्राय दिला आहे की ''संस्कृत वाङ्मय

शास्त्रीय विषय, गद्य आणि पद्य या सर्व शाखांतही सुसंपन्न आहे.'' (भा.श्रे.)

६६. आयुष्य पुरणार नाही

सर विल्यम जोन्स -

''भारतीय वाङ्मयाच्या एक दोन शाखांचे संपूर्ण अध्ययन करू म्हटले तरी त्यास एका जन्माचे संबंध आयुष्य पुरे होणार नाही.''

मॅक्समूलर -

''ज्यांची हस्तलिखिते सांप्रत उपलब्ध आहेत असे संस्कृत भाषेत दहा हजार निरनिराळे ग्रंथ आहेत'' असा मॅक्स मूलर यांनी हिशोब केला आहे! ''ग्रीस व रोम या दोन्ही देशांचे सर्व प्राचीन वाङ्मय एकत्र केले तरीही येवढी ग्रंथसंख्या भरणार नाही.''

(India what can it teach us? p 84)

(आज पाहिले तर जर्मनी व इंग्लंडमध्ये तीन लाखांच्यावर भारतीय ग्रंथ सुसंरक्षित असून त्यांचा अभ्यास चालू आहे.)

६७. हिंदू हारले जाणारे नाहीत

रेव्हरंड वार्ड -

''भारतीयांत बहुतेक प्रत्येक शास्त्राचे अध्ययन चालू होते. असे त्यांचे वाङ्मयावरून दिसून येते. शिवाय त्यांची त्या त्या विषयाची प्रतिपादन शैली सोपी असली तरी विद्वत्तेत ते कोणत्याही लोकांस हार जाणारे नाहीत, याचाही प्रत्यय येतो. त्यांचे तत्त्वज्ञानविषयक वाङ्मय व धर्मशास्त्रे यांचे जसजसे परिशीलन करावे तसतशी त्यांच्या विद्वत्तेची व शहाणपणाची खात्री पटत जाते.''

(Antiquity of Hinduism VOL. IV p. 129)

६८. बुद्धीचा शेवटचा पल्ला

मिसेस मॅनिंग -

''मानवी मन व बुद्धि यांची मजल जेथपर्यंत पोचणे शक्य आहे. तेथपर्यंतचा पल्ला भारतीयांच्या मन व बुद्धीने खास गाठला आहे.''

(Ancient and medieval India Vol . II p. 148)

६९. सूर्य आणि काजवा

श्लेजेल -

''हिंदूंच्या विचारात तडफ, भारदस्तपणा व विशुद्धता फार आहे. **ग्रीक** लोकांना ज्या ज्ञानाबद्दल फार अभिमान वाटतो तो हिंदूंच्या ज्ञानापुढे केवळ फिक्का पडल्यावाचून राहणार नाही. आणि या दोघात सूर्य व काजवा यांचीच उपमा शोभेल.'' (भा.श्रे.१७३)

जगद्गुरु

७०. भारत सर्व जगाच्या गुरुस्थानी

मॅक्समूलर -

''राष्ट्रात जिकडे तिकडे शांतता असून धनधान्याची समृद्धि आहे. काही ठळक ठळक कुटुंबाजवळ विपूल संपत्ती साठलेली आहे, सर्व लोकांना विद्या व कला यांचे ज्ञान होण्यास लागणारी विद्यालयें व विद्यापीठे भरपूर आहेत. अशा स्थितीत पोटाकरितां अहर्निश झटणाऱ्या लोकसमूहामधून थोड्यांना विद्या-कला अशासारख्या गोष्टींकडे लक्ष देण्यास सवड मिळते. व

त्यांतूनही काहींना त्यांचा ध्यास लागलेला असतो. अशा अल्पसंख्येतून भावी तत्त्वज्ञानी व सर्व जनांच्या चित्तांना अल्हाद व शांती देणारे तत्त्वज्ञान निर्माण होत असते.

हाच नियम जर हिंदुस्थानास लावला तर तो पूर्णपणे खरा ठरलेला पाहावयास मिळतो आणि येथील जगविख्यात तत्त्वज्ञान्यांची मोजदाद केल्यास वरील नियमान्वये हिंदुस्थान सर्व जगाच्या गुरुस्थानीच शोभेल यांत कांही संशय नाही.''(भा.श्रे.पा.१७२).

७१. निरक्षर पण उ□ा संस्कारसंपन्न

विसाव्या शतकातील आठव्या दशकात एक युरोपियन अभ्यासक ग्रामीण लोकसाहित्याचा अभ्यास करण्यासाठी पुण्याजवळ खेड्यातील लोकांसोबत राहिला. त्याने ४-६ महिने अध्ययन केले आणि तो परत गेला. निघते वेळी त्याने भारतातील खेड्यातील समाजाबद्दल जे उद्गार काढले ते अप्रतिम आहेत. तो म्हणतो -

''इल् लिटरेट बट हायली एज्युकेटेड''--

''भारतातील ग्रामीण समाज अक्षर शत्रू दिसतो त्याला लिहिता वाचता येत नाही, पण तो खऱ्या अर्थाने सुशिक्षित आहे. संस्कारसंपन्न आहे.''

प्राचीन भारताची समाजाला सुसंस्कृत करण्याची शिक्षणपद्धती विलक्षण आहे. रामायण, महाभारत, कीर्तन, प्रवचनादिंनी समाजातील सर्व थरांना सत्त्वसंपन्न ठेवले. मनोरंजनाच्या माध्यमाने नीती-धर्म-वेदान्त-भक्ती पासून सर्व काही समाजाला शिकविले. त्यामुळे सत्याची आवड आणि परस्परांना मदत करण्याची प्रवृत्ति आणि मात्रांविषयी करुणा या सर्व गोष्टी अंगभूत आल्या. त्या भारतीयांच्या जीन्समध्ये ओतल्या गेल्या याचा अनुभव विदेशी अभ्यासकाला आला. आणि त्यातील मर्म त्याने ओळखले. ही आपल्या संस्कृतीची नित्यनूतनता आहे !

याप्रमाणे आपल्या प्राचीन विश्वव्यापिनी आर्य संस्कृतीवर पाश्चात्य विद्वानांनी उधळलेल्या स्तुतिसुमनांच्या सुगंधाने आणि वर्षावाने आपण सुखावतो यात संशय नाही. आपल्या प्राचीन ***''उत्कर्षबोधक इतिहासाचा''***

ज्याप्रमाणे पाश्चात्यांनी अभ्यास केला त्याप्रमाणे
आपण भारतीयांनी देखील आपल्या पूर्वजांचा
उत्कर्ष बोधक इतिहास
आदरबुद्धीने
श्रद्धेने
डोळसपणाने
समन्वयात्मक रीतीने
अभ्यासिला पाहिजे.

०००